नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३५९ | Issue - 359 | वार - शुक्रवार दि. २२ मे २०२६ | Blow- Friday Date 22 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# विदर्भात उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट




## हवामान विभागाचा मोठा इशारा, काळजी घ्या!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महाराष्ट्रात तापमानवाढीचे मोठे संकट ओढावले आहे. विदर्भात तर तापमानवाढीचा अक्षरश: स्फोट होताना दिसत आहे. विदर्भात सूर्य आग ओकतोय की काय अशी अवस्था आहे. वर्धा जिल्ह्यात तापमान ४७ अंशापर्यंत पोहोचल्याची माहिती आहे. तसेच नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पार गेला आहे. यामुळे तापमानात झालेली वाढ ही किती भीषण आहे याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

हवामान विभागाकडून तापमानवाढीबाबत महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भातील तीन जिल्ह्यांना तापमानवाढीचा अक्षरश: रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर काही काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विशेष म्हणजे याआधी यलो अलर्ट दिला तेव्हाच परिस्थिती भीषण होती. त्यामुळे रेड अलर्टमुळे तापमानातवाढीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. हवामान विभागाचे तज्ज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

आता प्रतिचक्रवाती परिस्थितीमुळे सर्वसाधारणपणे तापमान वाढताना दिसतं. पण आता तशी परिस्थिती नाही. विदर्भाचे जे रिजन आहे, तिकडे आद्रतेचे प्रमाण कमी झाले आहे. आकाश निरभ्र आहे. अशा परिस्थितीत सूर्यकिरण जास्त तीव्रतेने येतात. हे एक कारण तापमानवाढीसाठी आहे, अशी माहिती हवामान तज्ज्ञ सानप यांनी दिली.

दक्षिण महाराष्ट्रातील एक-दोन जिल्ह्यांसाठी वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यंचा समावेश आहे. या तीन जिल्हे वगळता इतर ठिकाणी असा कोणता इशारा नाही, अशी माहिती डॉ. एस. डी. सानप यांनी दिली. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात जे काही वातावरण आहे, तशीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे. पण विदर्भात पुढच्या काही दिवसांमध्ये तापमान हे सर्वाधिक असण्याची शक्यता आहे, अशी देखील माहिती त्यांनी दिली.

मान्सूनची आताची सद्यस्थिती पाहिली तर तो अंदमानमध्ये पोहचला आहे. त्याने अंदमान पूर्णपणे कव्हर केला आहे. येत्या २६ मे ला पासून केरळमध्ये येण्याची शक्यता आहे. त्यामध्ये चार दिवसांच्या त्रुटी असू शकतात. याचाच अर्थ एक तर तो २२ मे ला देखील केरळमध्ये दाखल होऊ शकतो. किंवा २८ मे पर्यंत त्याची वाट पाहावी लागू शकते. महाराष्ट्राचं बघितलं तर वेळ लागतो. साधारणपणे केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर आठ ते दहा दिवसांत महाराष्ट्रात येतो, अशी महत्त्वाची माहिती हवामान तज्ज्ञांनी दिली.




हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, अकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यांना २३ मे पर्यंत उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर २४ आणि २५ तारखेसाठी उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांना पुढच्या तीन दिवसांसाठी उष्णतेचा लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

# पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाईंड पाकिस्तानात ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इस्लामाबाद: पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाईंड असलेला दहशतवादी हमजा बुरहान ची पाकिस्तानात हत्या झाली आहे. काही अज्ञात व्यक्तींनी बुरहानवर गोळीबार केला. त्यात बुरहान मारला गेला. पाकिस्तानच्या मुझफ्फराबादमध्ये बुरहानवर जीवघेणा हल्ला झाला. मुझफ्फराबाद पाकव्याप्त काश्मीरचा भाग आहे. २०१९ मध्ये पुलवामात भारतीय जवानांच्या ताफ्यावर हल्ला झाला. त्यात ४० पेक्षा जवान शहीद झाले. दहशतवादी हमजा बुरहान पुलवामातील दहशतवादी हल्ल्याच्या मास्टरमाईंडपैकी एक होता. शिक्षक अशी ओळख त्यानं तयार केली होती. शिक्षकी पेशाच्या आडून बुरहान दहशतवादी कारवाया केल्या होत्या.

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामात भारतीय सैन्याच्या ताफ्याला लक्ष्य करण्यात आलं. या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. या हल्ल्याचा मास्टरमाईंड असलेल्या हमजा बुरहानवर मुजफ्फराबादमध्ये काही अज्ञात व्यक्तींनी गोळी झाडली. बुरहान पाकव्याप्त काश्मीरमधील त्याच्या कार्यालयात बसलेला असताना त्याच्यावर हल्ला झाला. बुरहानच्या कार्यालयात काही जण पोहोचले. त्यांनी हमजावर अनेक गोळ्या झाडल्या. या गोळीबारानं हमजाच्या शरीराची अक्षरश: चाळण झाली. पुलवामातील दहशतवादी हल्ल्याचा कट रचणाऱ्यांमध्ये हमजाचा समावेश होता. तो स्वत:ची ओळख शिक्षक अशी सांगायचा. २०१९ नंतरही त्यानं अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये सक्रिय भूमिका पार पाडली. तो पाकव्याप्त काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत होता. सोबतच सीमावर्ती भागातून होणाऱ्या घुसखोरीत महत्त्वाची भूमिका पार पाडायचा. घुसखोरांना



मदत करायचा. पुलवामा हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं एअर स्ट्राईक केला. बालाकोटमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे तळ नेस्तनाबूत करण्यात आले. गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानातील दहशतवादी आणि त्यांचे म्होरके अज्ञात व्यक्तींकडून मारले जात आहेत. पाकिस्तान इन्स्टिट्यूट फॉर कॉन्फ्लिक्ट अँड सिक्युरिटी स्टडीज आणि सेंटर फॉर रिसर्च अँड सिक्युरिटी स्टडीज यांच्याकडे असलेल्या आकडेवारीनुसार २०२५ मध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांचा आकडा २११५ ते २५९७ च्या दरम्यान आहे. लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, हिझबुल मुजाहिद्दीन यांचे कमांडर, दहशतवादी अज्ञात हल्लेखोरांकडून मारले गेले आहेत.

# यूपीएससीच्या विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे (यूपीएससी) वर्ष २०२७ मध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती चाचण्यांचे अधिकृत वार्षिक वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार आगामी वर्षात नागरी सेवा, इंजिनिअरिंग सेवा, वैद्यकीय सेवा आणि संरक्षण दलातील विविध महत्त्वाच्या परीक्षा आयोजित केल्या जाणार आहेत. परिस्थितीनुसार या परीक्षांच्या तारखा आणि कालावधीमध्ये बदल केला जाऊ शकतो, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. देशभरातील लाखो उमेदवार विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात. यूपीएससीने जाहीर केलेल्या वेळापत्रकामुळे उमेदवारांना अभ्यासाचे नियोजन करणे, परीक्षेची तयारी करण्याचे अधिक नेमके नियोजन करण्यास मदत होते. परीक्षेची अधिसूचना जाहीर झाल्यापासून अर्ज करण्यासाठी साधारणपणे तीन ते चार आठवड्यांचा वेळ मिळतो. उमेदवारांनी अधिकृत आणि सविस्तर माहितीसाठी, कोणत्याही संभाव्य बदलांची माहिती घेण्यासाठी 'यूपीएससी'च्या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महत्त्वाच्या परीक्षा आणि वेळापत्रक

१) नागरी सेवा आणि वन सेवा परीक्षा: देशातील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी 'नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२७' आणि 'भारतीय वनसेवा पूर्व परीक्षा २०२७' ही संयुक्तपणे २३ मे २०२७ रोजी होणार. या परीक्षेची अधिसूचना १३ जानेवारी २०२७ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. उमेदवारांना अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत २ फेब्रुवारी २०२७ असेल. तर 'नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२७' ही २० ऑगस्ट २०२७ पासून सुरू होणार आहे. तसेच 'भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा २०२७' २१ नोव्हेंबर २०२७ पासून आयोजित केली जाणार आहे.

२) अभियांत्रिकी आणि भू-वैज्ञानिक परीक्षा: 'संयुक्त भूवैज्ञानिर पूर्व परीक्षा' १० जानेवारी २०२७ रोजी, तर 'अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा' ३१ जानेवारी २०२७ रोजी घेण्यात येईल. या दोन्ही परीक्षांची मुख्य परीक्षा अनुक्रमे १९ जून २०२७ आणि १८ जून २०२७ रोजी सुरू होणार आहेत.

३) संरक्षण आणि सुरक्षा दलांच्या परीक्षा: एनडीए आणि एनए परीक्षा (ख) व सीडीएस परीक्षा (ख): या दोन्ही परीक्षा ११ एप्रिल २०२७ (रविवार) रोजी आयोजित केल्या जातील. एनडीए आणि एनए परीक्षा (खख) व सीडीएस परीक्षा (खख): या परीक्षा १९ सप्टेंबर २०२७ रोजी होतील. सेंट्रल आर्म्ड पोलीस फोर्सेस परीक्षा २०२७: ही परीक्षा ४ जुलै २०२७ रोजी घेतली जाईल, ज्यासाठी १७ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२७ या कालावधीत अर्ज करता येतील.

४) वैद्यकीय आणि सांख्यिकी सेवा परीक्षा: 'संयुक्त वैद्यकीय सेवा परीक्षा २०२७' ही परीक्षा १८ जुलै २०२७ रोजी, तसेच 'आयईएस/आयएसएस परीक्षा २०२७' ही १८ जून २०२७ पासून सलग तीन दिवस चालणार आहे.

५) विभागीय परीक्षा आणि राखीव तारखा: आयोगाने विभागीय परीक्षांचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. त्यात सीबीआय डीएसपी परीक्षा २७ फेब्रुवारी २०२७ रोजी, सीआयएसएफ 'परीक्षा १४ मार्च २०२७ रोजी आणि स्टेनो परीक्षा १८ डिसेंबर २०२७ रोजी घेतली जाईल. वर्षभरात इतर विविध भरती चाचण्यांसाठी जानेवारी, मार्च, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर आणि डिसेंबर महिन्यांत ठराविक शनिवार, रविवारच्या तारखा राखीव ठेवण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### राज्यस्तरीय बँकिंग कमिटी एसएलबीसीची बैठकीत मुख्यमंत्र्यांचे निर्देश

# पीक कर्जासाठी सीबीलची अट नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृहावर अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी आगामी काळात कृषी क्षेत्रावर असणाऱ्या संभाव्य संकटाबाबत माहिती दिली. तसेच या संभाव्य संकटाच्या पार्श्वभूमीवर केल्या जात असणाऱ्या उपाययोजनांची देखील सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांना खरीप हंगामात शेतासाठी पैशांची कमतरता भासू नये यासाठी बँकांना महत्त्वाचे निर्देश दिल्याचं देखील देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. तसेच शेतकरी कर्जमाफी ही ३० जूनपर्यंत करु, अशी देखील माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अल निनोच्या संभाव्य धोक्यावरही चिंता व्यक्त केली. तसेच या काळात काय-काय उपाययोजना केल्या जातील, याबाबत सविस्तर माहिती दिली.

आज राज्याच्या येत्या कृषीच्या खरीप हंगामाची हंगामपूर्वी तयारीची बैठक घेतली. त्यापूर्वी राज्यस्तरीय बँकिंग किमिटी एसएलबीसीची बैठक झाली. या बैठकीत एकूण कर्जवाटपाबाबत चर्चा झाली. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कर्ज कसं मिळू शकेल या संदर्भात सगळी तसबीज करण्यात आली, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

### जलयुक्त शिवारचे कामे वेगाने करा : मुख्यमंत्री फडणवीस

असं लक्षात आलं की, आपल्या ज्या जिल्हा सहकारी बँका आहेत, आणि ग्रामीण बँक, या मिळून ६७ टक्के शेतकऱ्यांना कर्ज दिलं जातं. राष्ट्रीयकृत बँका या शेतकऱ्यांना केवळ २६ टक्के कर्ज देतात. डीसीसी आणि ग्रामीण बँकेचा जो टार्गेटचा ॲचिव्हमेंट आहे ते ८० टक्क्यांच्यावर आहे. पण राष्ट्रीयकृत बँकांचं ६७ टक्के आहे. त्यामुळे आज अतिशय कडक शब्दांमध्ये राष्ट्रीयकृत बँकांना हे सांगण्यात आलं आहे की, त्यांनी ८० टक्क्याच्यावर टार्गेट प्रूण केलं पाहिजे. दुसरं त्यांना सांगण्यात आलं आहे की, सीबीलची मागणी कोणत्याही बँकेने करु नये. या संदर्भात मी सगळ्या बँकांना सांगितलं आहे की, मुख्यालयमधून प्रत्येक शाखेला पत्र पाठवून सांगितलं पाहिजे की, पीक कर्जासाठी सीबीलची अट नाही. आरबीआयचेदेखील अधिकारी होते. त्यांनीदेखील त्याला पुष्टी दिली आहे. याबाबत आपण आदेश काढले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

सर्व बँकांशी कर्जमाफीबाबत चर्चा केली आहे. जी काही कर्जमाफी करायची आहे, त्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. आम्ही कर्जमाफीच्या संदर्भात जो निर्णय घेतला आहे तो वेळेत पूर्ण करु अशा पद्धतीने त्याचं नियोजन केलेलं आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रावर अल निनोचं संकट, मुख्यनमंत्र्यांकडून चिंता व्यक्त, उपाययोजनांची दिली माहिती

महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम हा खरिपाचा असतो. त्यानंतर रब्बी आणि उन्हाळी पिकं शेतकरी घेतात. खरिपाचं क्षेत्र १५२ लाख आहे. यामध्ये सर्वात मोठं क्षेत्र सोयाबीन आणि कापूस यांचं जवळपास ८८ लाख हेक्टर असतं. ऊसही आपण मोठ्या प्रमाणात घेतो. आता खरीप हंगामात मोठं संकट हे अल निनोचं आहे. आज हवामान विभागाने केलेल्या मांडणीनुसार, पावसाचं लाँग टर्म ॲव्हरेज ८८ टक्के असेल असा अंदाज वर्तवला आहे. असं असलं तरी ते वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारचे असेल. विशेषत: पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राचा काही भाग यामध्ये त्याची तीव्रता अधिक जास्त असण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजच्या खरीप हंगामाच्या बैठकीत हवामानाच्या अंदाजानुसार प्लॅनिंग कसा करता येईल हा प्रयत्न केला आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

उतरत्या क्रमाने पाऊस असण्याची शक्यता आहे. जूनमध्ये पाऊस येईल. त्यापेक्षा कमी जुलैमध्ये येईल. त्यापेक्षा कमी ऑगस्ट आणि त्यापेक्षा कमी सप्टेंबरमध्ये असा प्राथमिक अंदाज आहे. पावसाच्या दोन दिवसांमध्येही मोठं अंतर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिकांवर परिणाम होतो. त्यामुळेच जलयुक्त शिवारचे कामे वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत. ज्यातून पडलेला पावसाचे पाणी आपण जरी थांबवू शकलो तर किमान प्रोटेक्टिवर इरिगेशन करता येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



गेल्या काही वर्षातील अल निनोची जे वर्ष आहेत त्यापैकी २०१५ चे वर्ष खूप कठीण होतं. त्या वर्षी मराठवाड्यात ६१ टक्केच पाऊस पडला होता. अशा प्रकारची परिस्थिती आली तर काय करायला पाहिजे याबाबत प्रत्येक जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत, असं देखील मुख्यमंत्र्यांनी दिलं.

# पेट्रोल पंपांवर तोबा गर्दी; सरकारकडून आनंद वार्ता, चिंताच मिटली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: पेट्रोल , डिझेल जपून वापरा. इंधनाची बचत करा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केलं. मध्य पूर्वेतील संघर्ष आणि त्यामुळे जागतिक पातळीवर निर्माण झालेली तेल टंचाई या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी देशातील जनतेला इंधनाची काटकसर करण्याचं आवाहन केलं. त्यानंतर इंधन खरेदीसाठी पेट्रोल पंपांवर मोठी झुंबड उडाली. गेल्या आठवड्याभरात पेट्रोल, डिझेलचे दर दोनदा वाढले आहेत. या कालावधीत डिझेलची मागणी सर्वाधिक वाढली आहे. डिझेलची कमतरता असल्याच्या चर्चा झडू लागल्यानं डिझेल खरेदीसाठी चढाओढ सुरु झाली. या पार्श्वभूमीवर सरकारकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली आहे.

देशात इंधनाची कोणतीही कमतरता नसून लोकांनी घाबरुन जाऊन इंधनाची जास्त खरेदी करु नये, असं आवाहन भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं केलं आहे. मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी गुरुवारी देशातील डिझेल उत्पादन आणि त्याची वास्तविक मागणी यांची आकडेवारी सादर केली. 'गेल्या महिन्यात म्हणजेच एप्रिलमध्ये भारतानं एकूण १० मिलियन मेट्रिक टन डिझेलचं उत्पादन केलं. त्याच्या तुलनेत देशातील झालेला तेलाचा एकूण खप जवळपास ८ मिलियन मेट्रिक टन इतका होता,' अशी आकडेवारी सुजाता शर्मा यांनी दिली.

देशात असलेली डिझेलची एकूण मागणी आणि डिझेलचं एकूण उत्पादन यांच्यात जवळपास २ मिलियन मेट्रिक टनचं अंतर आहे. याचा अर्थ मागणीपेक्षा उत्पादनाचा आकडा मोठा आहे. अशा स्थितीत देशात डिझेलची कोणतीही कमतरता नाही.

मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, देशातील रिटेल इंधन आऊटलेट्सवर डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आबे. गेल्या काही दिवसांमध्ये पेट्रोल पंपांवरील ग्राहकांची संख्या अचानक वाढलेली आहे. सध्याच्या घडीला पेट्रोल पंपांवरील मागणी २० ते २५ टक्क्यांनी वाढल्याचं सुजाता शर्मा यांनी सांगितलं. सर्वसाधारणपणे प्रत्येक पेट्रोल पंपाकडे २ ते ३ दिवसांचा पेट्रोल आणि डिझेल साठा उपलब्ध असतो. पण लोकांनी घाबरुन जाऊन अतिरिक्त इंधन खरेदी सुरु केली. त्यामुळे मागणी अचानक वाढली आणि पुरवठा साखळीवर दबाव वाढला. यामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला, अशी माहिती शर्मा यांनी दिली. लोकांनी संयम ठेवावा आणि घाबरुन जास्त इंधन खरेदी करु नये, असं आवाहन त्यांनी सरकारच्या वतीनं केलं.

## संपादकीय....

### काळजी घ्या

मान्सूनची आताची सद्यस्थिती पाहिली तर तो अंदमानमध्ये पोहोचला आहे. त्याने अंदमान पूर्णपणे कव्हर केला आहे. येत्या २६ मे ला पासून केरळमध्ये येण्याची शक्यता आहे. दरम्यान महाराष्ट्रात तापमानवाढीचे मोठे संकट ओढावले आहे. विदर्भात तर तापमानवाढीचा अक्षरशः स्फोट होताना दिसत आहे. विदर्भात सूर्य आग ओकतोय की काय अशी अवस्था आहे. वर्धा जिल्ह्यात तापमान ४७ अंशापर्यंत पोहोचल्याची माहिती आहे. तसेच नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पार गेला आहे. यामुळे तापमानात झालेली वाढ ही किती भीषण आहे याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. हवामान विभागाकडून तापमानवाढीबाबत महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भातील तीन जिल्ह्यांना तापमानवाढीचा अक्षरशः रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर काही काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विशेष म्हणजे याआधी यलो अलर्ट दिला तेव्हाच परिस्थिती भीषण होती. त्यामुळे रेड अलर्टमुळे तापमानातवाढीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आता प्रतिचक्रवाती परिस्थितीमुळे सर्वसाधारणपणे तापमान वाढताना दिसतं. पण आता तशी परिस्थिती नाही. विदर्भाचे जे रिजन आहे, तिकडे आद्रतेचे प्रमाण कमी झाले आहे. आकाश निरभ्र आहे. अशा परिस्थितीत सूर्यकिरण जास्त तीव्रतेने येतात. हे एक कारण तापमानवाढीसाठी आहे. दक्षिण महाराष्ट्रातील एक-दोन जिल्ह्यांसाठी वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यंचा समावेश आहे. या तीन जिल्हे वगळता इतर ठिकाणी असा कोणता इशारा नाही. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात जे काही वातावरण आहे, तशीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे. पण विदर्भात पुढच्या काही दिवसांमध्ये तापमान हे सर्वाधिक असण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्राचे 'एसटीपी मॉडेल' देशासाठी रोल मॉडेल ठरणार: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील सांडपाणी प्रक्रिया केंद्र मॉडेल अत्यंत प्रभावी ठरले असून, लवकरच हे मॉडेल राष्ट्रीय स्तरावर एक 'आदर्श मॉडेल' म्हणून विकसित केले जाणार आहे. ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद असून, राज्य सध्या शून्य कचरा आणि कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती या संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी ठोस पावले उचलत असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.




केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे आयोजित 'स्वच्छ भारत मिशन अर्बन २.०' च्या राष्ट्रीय आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृहनिर्माण, शहरी विकास आणि ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर हे होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री तोखन साहू, मंत्रालयाचे सचिव कटिकिथला श्रीनिवास यांच्यासह विविध राज्यांचे नगरविकास व गृहनिर्माण मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी या बैठकीत विविध राज्यांमध्ये सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमा आणि उपक्रमांची सविस्तर माहिती यावेळी घेतली. एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन आणि पीपीपी वित्तीय मॉडेल शहरांमधील जुन्या कचरा डेपोचे वेळेत निर्मूलन करणे.ओडीएफ++ दर्जा राखणे आणि संपूर्ण यांत्रिकीकृत मलनिस्सारण करणे. तसेच नव्याने लागू झालेल्या 'सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट नियम २०२६' चा आढावा यावेळी घेतला. स्वच्छ सर्वेक्षण' आणि 'स्वच्छ शहर जोडी' उपक्रमांतर्गत राज्यांनी एकमेकांच्या सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करावा, अशी महत्त्वाची सूचना केंद्रीय मंत्री यांनी केली. स्वच्छता हा केवळ प्रशासकीय कार्यक्रम नसून ते सार्वजनिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा आणि नागरिकांच्या जीवनमानाशी जोडलेले सामूहिक कर्तव्य आहे,असे स्पष्ट करत त्यांनी सर्व राज्यांना स्वच्छतेच्या कामाला अधिक गती देण्याचे आवाहन केले.

**महाराष्ट्रातील स्वच्छता उपक्रमांचे सादरीकरण**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध स्वच्छता मोहिमा आणि प्रकल्पांच्या कामांचे सविस्तर सादरीकरण बैठकीत केले. केंद्र सरकारने या बैठकीत केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्राची सद्यस्थिती आणि भविष्यातील योजना मांडताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, स्वच्छ भारत अभियान हे आता केवळ शासकीय मोहिमेपुरते मर्यादित राहिलेले नसून, ते एक व्यापक जनआंदोलन बनले आहे. महाराष्ट्रात 'वेस्ट टू वेल्थ' (कचऱ्यातून संपत्ती निर्मिती), कंप्रेस्ड बायोगॅस प्रकल्प आणि राज्याचे 'हरित धोरण' यांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे कचऱ्याचे मौल्यवान संसाधनात रूपांतर करण्याचे काम वेगाने सुरू आहे. या मोहिमेला गती देण्यासाठी राज्य सरकार सार्वजनिक-खासगी भागीदारी मॉडेलच्या माध्यमातून विविध उपक्रमांना सक्रिय पाठबळ देत आहे.

उपमुख्यमंर्त्यानी यावेळी स्वच्छतेच्या मूळ संकल्पनेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, स्वच्छतेचे उद्दिष्ट केवळ परिसर स्वच्छ ठेवण्यापुरते मर्यादित नाही, तर नागरिकांच्या मानसिकतेत आणि सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे हे या अभियानाचे मुख्य ध्येय आहे आणि महाराष्ट्र यात यशस्वी ठरत आहे. जनतेचा सक्रिय सहभाग, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या बळावर देशातील स्वच्छता अभियानाला एक नवी उंची मिळेल, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

## विलिनीकरणावर शरद पवार गटाची भूमिका स्पष्ट; आमदार रोहित पवार यांची नाराजी दूर केली जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षांचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात विलिनीकरण होणार नाही. विलिनीकरणाची कोणतीही चर्चा सुरू नाही. पक्ष संघटना मजबूत करुन मोठ्या उमेदीने पुढे जायचे आहे. पूर्ण ताकतीने पक्ष उभा करायचा आहे, त्यासाठी कामाला लागा, असे आदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पक्षाध्यक्ष, खासदार शरद पवार, कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील आदींसह पदाधिकरी उपस्थित होते. दिवगंत अजित पवार यांच्या सोबत आमची विलिनीकरणाची चर्चा झाली होती. त्यांच्या निधनानंतर विलिनीकरणाची कोणतीही चर्चा सुरू नाही. विलिनीकरणाचा विषय बंद आहे. त्यामुळे पक्षाला मोठ्या उमेदीने पुढे नेण्यासाठी, पक्षाची नव्याने बांधणी करण्यासाठी खासदार, आमदार आणि पदाधिकाऱ्यांना एकत्रित आणि समन्वयाने काम करण्याचा निर्णय झाला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली सक्षम विरोधी पक्ष म्हणून आम्ही उभा राहणार आहोत. शरद पवार यांचे नेतृत्व आणि त्यांचाच चेहरा घेऊन आम्ही महाराष्ट्रभर जाणार आहोत. असे शिंदे यांनी सांगितले. १५ ऑगस्टनंतर सरकारविरोधात राज्यभरात जागृती मोहीम सुरू करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली. आमदार रोहित पवार माध्यमांशी काय बोलले, काय सांगितले आहे, ते मला माहीत नाही. पण, आम्ही पक्षाच्या शिस्ती राहून एकत्र काम करू. त्यांची काही नाराजी असेल तर दूर करून भविष्य काळामध्ये आक्रमकपणे आंदोलने करणार आहोत. पदाधिकाऱ्यांसाठी एक शिबिर आयोजित करणार आहेत. नीट पेपर फुटीचा प्रश्न आहे, इंधन दरवाढ, महागाई आहे, या सर्व गोष्टींचा विचार करून पक्ष मजबूत करण्यात येईल. पक्षाच्या चौकटीमधूनच पुढे जाण्याचा प्रयत्न करणार आहोत, असेही शिंदे यांनी बोलताना सांगितले. आजच्या बैठकीला रोहित पवार अनुपस्थित असल्याने त्यावरून चर्चा सुरू झाली होती.

## वैनतेयच्या विद्यार्थ्यांची कामगिरी, जिल्ह्यातील ७८६ प्रकल्पामधून इन्क्युबेशन एग हॅचरी मशीन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या इन्क्युबेशन एग हॅचरी मशीनया प्रकल्पाची जिल्हास्तरीय गटात निवड झाली आहे.

निफाड येथील वैनतेय विद्यालय व जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या अटल टिंकरिंग लॅबमध्ये इयत्ता ८ वीचे विद्यार्थी अर्णव प्रदीप खडताळे व फईम बिस्मिल्लाह सय्यद यांनी पक्षी संवर्धनासाठी इन्क्युबेशन एग हॅचरी मशीन हा अभिनव प्रकल्प तयार केला आहे.


या प्रकल्पासाठी मार्गदर्शक शिक्षक प्रा. शिरीष पंडित यांच्यासह विद्यालयातील गणित व विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन केले असून पक्षी मित्र बिरजू पठाण यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

**या प्रकल्पाची प्रोटो टाईप गटामध्ये जिल्हास्तरावर निवड**

निफाडजवळील नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात हिवाळ्यात विविध दुर्मिळ स्थलांतरित पक्षी येतात. यातील काही पक्ष्यांची अंडी अभयारण्य परिसरात आढळून येतात. अशा अंड्यांचे संरक्षण करून त्यांना सुरक्षितरीत्या उबवण्यासाठी विद्यार्थ्यांनी हे इन्क्युबेशन एग हॅचरी मशीन तयार केले आहे. या मशीनमध्ये नियंत्रित तापमान, उष्णता व सुरक्षित उबवण व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे अंड्यांमधून पिल्ले बाहेर येण्यास मदत होत असून दुर्मिळ पक्ष्यांच्या संवर्धनासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे.

विद्यार्थ्यांनी या प्रकल्पाचा व्हिडिओ विकसित भारत बिल्डथोन स्पर्धेमध्ये सादर केला होता. नाशिक जिल्ह्यातील ७८६ प्रोजेक्टमधून या प्रकल्पाची प्रोटो टाईप गटामध्ये जिल्हास्तरावर निवड झाली असून विद्यार्थ्यांनी मानाचा क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या संशोधनात्मक कार्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होत असल्याचे मत व्यक्त होत आहे.

या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, विश्वस्त रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे तसेच विद्यालयाच्या प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य एस. पी. खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, पर्यवेक्षिका आर एम लाहोटी यांनी अभिनंदन केले.



## प्रल्हाद सांगळे यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील कुरुडगाव येथील प्रल्हाद मुरलीधर सांगळे यांचे दुःखद निधन झाले ते ८१ वर्षाचे होते.

त्यांच्या पश्चात ३ मुले, १मुलगी, २ भाऊ, २ बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कुरुडगाव सोसायटीचे चेअरमन आणि कुरुडगावचे उपसरपंच संदेश सांगळे यांचे ते वडील होय.

## रस्त्यावरील व दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक; मंत्री आदिती तटकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रस्त्यावर राहणाऱ्या, अनाथ, एकल आणि दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' पथदर्शी योजना सहा जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आली होती. या पथदर्शी योजनेच्या धर्तीवर २२ जिल्ह्यातील ३१ महानगरपालिकांमध्ये फिरते पथक योजनेसाठी प्रस्ताव मागविण्याचे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.मंत्रालयात 'फिरते पथक' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित होते.या योजनेअंतर्गत मोबाईल वाहनांच्या माध्यमातून रस्त्यावरील बालकांना पौष्टिक आहार, आरोग्य सेवा, शिक्षण, मनोरंजन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच बालकांची आधार नोंदणी, समुपदेशन, मानसिक आधार आणि पालकांमध्ये शिक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते. रस्त्यावरील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. यापूर्वी नाशिक, पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि नागपूर या सहा जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाद्वारे आतापर्यंत ३ हजार ८०३ बालकांना शैक्षणिक, आरोग्यविषयक, मनोरंजन तसेच आहार सुविधा पुरविण्यात आल्या असून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश आले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार ६७९, मुंबई शहरात ८१०, ठाण्यात ७५०, नाशिकमध्ये २८५ आणि नागपुरात २७९ बालकांचा समावेश आहे.राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांसह मुंबई शहर, पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर अशा एकूण ३१ फिरत्या पथकांची अंमलबजावणी प्रस्तावित करण्यात आली आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, स्वयंसेवी संस्थांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणी, निधी पोर्टलवरील नोंद, मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल तसेच संस्थेची घटना आणि नियमावली सादर करणे आवश्यक राहील. तसेच फिरत्या पथकांसाठी नियुक्त वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि ट्रॅकिंग सिस्टीम बसविणे बंधनकारक करण्यात येणार असून ही यंत्रणा संबंधित पोलीस विभागाच्या समन्वयाने कार्य करेल. संबंधित संस्थांनी बाल कल्याण समिती, बाल हक्क आयोग आणि स्थानिक पोलीस प्रशासनाला आपल्या कार्यक्षेत्राची माहिती देणेही आवश्यक राहणार आहे. संस्थांकडून नव्याने अर्ज मागविण्यात येणार असून संपूर्ण प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तेजस नेटवर्क्स आणि महाआयटीमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील टियर-२, टियर-३ आणि वंचित भागातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना उदयोन्मुख दूरसंचार तंत्रज्ञानाचे जागतिक दर्जाचे प्रशिक्षण व प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी तेजस नेटवर्क्स आणि महाआयटी यांच्यात आज सामंजस्य करार करण्यात आला. हा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव परिमल सिंह, महाआयटीच्या आयुक्त भुवनेश्वरी एस., महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर तसेच सीएसआर सहभागी यांच्या उपस्थितीत हॉटेल प्रेसिडेंट येथे आयोजित 'टेकमहा इम्पॅक्ट २०२६' परिषदेत करण्यात आला.

या कराराअंतर्गत राज्यातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन तसेच प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दूरसंचार आणि डिजिटल तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण दिले जाणार आहे. उद्योग-शैक्षणिक सहकार्य, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाधारित क्षमता वृद्धी यांसाठीही दोन्ही संस्था संयुक्तपणे काम करणार आहेत.

महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांनी सांगितले की, दूरसंचार अभियंत्यांच्या प्रशिक्षण व क्षमता विकासाला गती देण्यासाठी तेजस नेटवर्क्ससोबतची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. 'डिजिटल महाराष्ट्र' या आधुनिक आणि सर्वसमावेशक संकल्पनेच्या पूर्ततेसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बीएसएनएल ४जी५जी, भारतनेट, नॅशनल नॉलेज नेटवर्क तसेच संरक्षण आणि सार्वजनिक नेटवर्क प्रकल्पांमध्ये तेजस नेटवर्क्सचा मोठा अनुभव असल्याने ही भागीदारी राज्यासाठी लाभदायी ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

तेजस नेटवर्क्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक अर्नोब रॉय यांनी सांगितले की, महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी आधुनिक दूरसंचार तंत्रज्ञानात प्राविण्य असलेले मनुष्यबळ आवश्यक आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील तरुण अभियंत्यांची रोजगारक्षमता आणि उद्योगसिद्धता वाढविण्यासाठी दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची कंपनीची बांधिलकी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तेजस नेटवर्क्सचे उपाध्यक्ष (विक्री) सुनील हंडू यांनी महाआयटीच्या विविध आयसीटी उपक्रमांमुळे महाराष्ट्र डिजिटल प्रशासनात अग्रणी राज्य म्हणून उदयास येत असल्याचे सांगितले. या उपक्रमांना अधिक बळकटी देण्यासाठी आणि भविष्योन्मुख अभियंता मनुष्यबळ घडविण्यासाठी कंपनी आपले तांत्रिक कौशल्य उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## सोन्याच्या दरात पुन्हा मोठी उसळी; एकाच दिवसात प्रति तोळा १३१० रुपयांची वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जागतिक बाजारपेठेतील घडामोडी आणि वाढत्या राजकीय तणावाचा थेट परिणाम पुन्हा एकदा भारतीय ग्राहकांवर दिसून आला आहे. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने चढ-उतार सुरू असून, मागील आठवड्यात दरात झालेल्या घसरणीमुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र हा दिलासा अल्पकाळच टिकला. सोन्याच्या दरात आज पुन्हा मोठी वाढ नोंदवली गेली असून, प्रति तोळा (१० ग्रॅम) तब्बल १,३१० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला पुन्हा एकदा झळ बसली आहे.तज्ज्ञांच्या मते, इराण आणि अमेरिकेमधील वाढता युद्धजन्य तणाव हा या दरवाढीमागील प्रमुख कारण आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघर्षामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली असून, कच्च्या तेलाच्या किमतींमध्येही सातत्याने वाढ होत आहे. परिणामी महागाईचा दबाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अशा अनिश्चित परिस्थितीत गुंतवणूकदार शेअर बाजारासारख्या जोखमीच्या पर्यायांऐवजी सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळत आहेत. सोन्याच्या वाढत्या मागणीमुळे दर पुन्हा भडकले आहेत. सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे लग्नसराई आणि गुंतवणुकीसाठी सोने खरेदी करणाऱ्या ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बाजारातील तणाव आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता, येत्या काही दिवसांत सोन्याचे दर आणखी वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरूवात

## स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयात ही सुविधा उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा (पदविका) इंजिनिअरिंगमध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.) क्र.- ६४३७ ची मान्यता मिळाली असून बुधवार (दि.२० मे २०२६) पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्चिती आदी प्रक्रिया सुरू झाली असून ही प्रक्रिया सोमवार दि. २२ जून २०२६ पर्यंत चालणार आहे.' अशी माहिती प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी दिली.




सन २०२६-२७ करीता डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन प्रमाणपत्रे, कागदपत्रांची तपासणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रिया करण्याकरिता मुंबई येथील मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (डी.टी.ई) यांचे अधिकृत केंद्र (फॅसिलिटेशन सेंटर क्र.-६४३७) म्हणून स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयास मान्यता दिली आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन, पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होणारी अडचण व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्र सुरु केले आहे. डिप्लोमा इंजिनिअरिंगचे यंदाचे हे १७ वे वर्ष आहे. स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

सदरच्या रजिस्ट्रेशनची प्रकिया दि. २० मे २०२६ पासून ते दि. २२ जून २०२६ सायं. ५ वाजेपर्यंत चालणार आहे. याचा लाभ दहावी मधून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी घेण्याचे आवाहन केले आहे. दिलेल्या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा. एस. एस. गायकवाड (९८९०५६६२८१) व प्रा. जे. बी. रोडगे (९७६७८५६०२९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी केले आहे. स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डिप्लोमा इंजिनिअरिंग फॅसिलिटेशन सेंटरमध्ये सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत असून मार्गदर्शन करण्यासाठी उच्चशिक्षित प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# सिन्नूर येथे श्री सच्चिदानंद शिवायोगी महाराज यांच्या ३४ व्या जत्रा उत्साहाने साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील सिन्नूर येथे श्री सच्चिदानंद शिवायोगी महाराज यांच्या३४ व्या जत्रा उत्वाने साजरा करण्यात आले प्रारंबी संगमेश्वर मंदिर बसावेश्वर चौक बसस्टॅण्ड मार्गतुन शांती मठ पर्यंत रता तुन जगदीश्वरनंद शिवयोगी महाराजांचे मिरवणूक करण्यात आला या मेरवाणुकीत अनेक संस्कृती वाद्य ब्यँजो पुरंत असे प्रकार विविध रित्या नृत्य करत पल्लकी मिरवणूक करण्यात आले.

यावेळी मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सतलिंगप्पा जेवार्गी, सतलिंगप्पा सोन्नद राजू हौदे, आणविरंय स्वामी सिद्दाराम, जेवर्गी लिंगराज हौदे, प्रकाश कालसगोंड, जगदीश उजनी चेन्नय स्वामी शरण अंतर्गगा जगू तोळानूर, संगमेश सुतार, रवी जेवर्गी, भुताळी कालसगोंड, सुभाष उजनी, पत्रकार निंगप्पा निंबाळकर, परमेश्वर उजनी, लक्ष्मीमिपुत्र हौदे, बसवराज जीवापूर, सिद्दान्ना देसाई, महादेव हौदे, बसंन्नगौड पाटील, शिवा-पुत्र जेवर्गी, सोम्म्या स्वामी, शिवू सोन्नदा आदी गावातील नागरिक मोट्या प्रमाणात उपस्थिती होते.

# निफाड कॉंग्रेसच्या वतीने राजीव गांधी यांना अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आधुनिक भारताचे शिल्पकार, संगणक युगाचे प्रवर्तक, पंचायत राज व्यवस्थेचे जनक भार-तरत्न राजीवजी गांधी यांच्या ३५ व्या स्मृतिदिनानिमित्त निफाड तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शिंदे यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी विनायक शिंदे व सुहास सुरळीकर यांनी मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे, शहराध्यक्ष स्वप्नील बिनायकिया, भटके विमुक्त सेलचे अध्यक्ष संपतराव कराड, तालुका उपाध्यक्ष अलीभाई शेख, बाळासाहेब खालकर, प्रदीप कापसे, सुरेश गोसावी, अमिन कुरेशी आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क** : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र ( बार्टी) येथे आज भेट देऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आले यावेळी मौजे गोगांव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका केंद्रासाठी सहकार्य करण्यात आश्वासन देण्यात आले यावेळी सिद्धार्थ सोशाल फाउंडेशन अध्यक्ष तथा उपसरपंच कमलाकर सोनकांबळे ,रामदास लोखंडे, महमंद कलाल, दयानंद बनसोडे, आदी उपस्थित होते.



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क** : सांगवी पुणे येथे अक्कलकोट तालुक्याचे सुपुत्र श्रावस्ती बुद्ध विहाराचे प्रमुख बिल्डर तथा आंबेडकर चळवळीतील पुण्याचे ज्येष्ठ नेते मा. कैलास भाऊ बनसोडे, पत्रकार संपादक गोगावंचे उपसरपंच मा. कमलाकर सोनकांबळे व कॉन्ट्रॅक्टर दयानंद बनसोडे यांनी भेट घेतली यावेळी विविध सामाजिक विषयावर चर्चा झाली.

# प्रेरणा बहुउद्देशीय समाजिक संस्थेच्या शाळाबाह्य मुलांसाठी सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : चंदेरी दुनियेचे आकर्षण, मला काहीतरी वेगळे करायचे आहे, 'डर के आगे जीत है', 'हे मर्दाचे काम आहे', 'चल तर करून बघ', 'काय बायकांसारखी कारणे देतोस' अशा भ्रामक विचारसरणींना आजची तरुण पिढी सहज बळी पडत आहे. शिक्षण महाग झाल्यामुळे अनेक गरीब व वंचित मुलांना शिक्षणापासून दूर राहावे लागत असून अज्ञानामुळे काही किशोरवयीन मुले गुन्हेगारीकडे वळताना दिसत आहेत. अशा मुलांना योग्य मार्गावर आणण्यासाठी वाड्या-वस्त्यांवर जाऊन सर्वंकष लैंगिक शिक्षणाचे धडे देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले.

प्रिसिजन फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वंकष लैंगिकता शिक्षण व जीवन कौशल्य विकास या प्रकल्पांतर्गत प्रेरणा बहुउद्देशीय समाजिक संस्थेच्या शाळाबाह्य मुला-मुलींसाठी विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रेरणा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा प्रमिला उबाळे, कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा कांबळे, उर्मिला बनसोडे, संध्या वाघमारे, विकी शिवशरण तसेच लॅब टेक्निशियन प्रीती चौधरी उपस्थित होत्या.

प्रशिक्षण शिबिरामध्ये किशोरवयीन मुला-मुलींना वैयक्तिक स्वच्छता, संतुलित आहार, किशोरावस्थेत होणारे शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळी व्यवस्थापन, रक्तक्षय प्रतिबंध, एचआयव्ही/एड्स जनजागृती, कॅन्सर प्रतिबंध, चांगला व वाईट स्पर्श, सायबर सुरक्षितता तसेच महिलांचे आरोग्य आणि हक्क याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञांनी मुला-मुलींना भावनिक संतुलन, आत्मसंरक्षण आणि सकारात्मक निर्णयक्षमता विकसित करण्याचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमादरम्यान संवादात्मक उपक्रम, गटचर्चा, प्रश्नोत्तर सत्र, शैक्षणिक खेळ तसेच जीवन कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून सहभागी मुलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध विषयांवरील शंकांचे निरसन करून घेतले.

शाळाबाह्य मुलांसाठी आयोजित या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया मुख्यालयाचे डायरेक्टर - ॲडोलेसेंट प्रोग्राम डॉ. निलेश पाटील, प्रिसिजन फाउंडेशनचे मॅनेजर - पब्लिक रिलेशन विभाग एन. एन. फलटणकर, वैशाली बनसोडे तसेच शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

**रक्तदानाला उत्स्फूर्त सहभाग**

**विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दिली भेट**

# स्व. माधवराव (काका) पाटील यांच्या पुण्यतिथी मुरुम शहरात रक्तदान शिबिराने साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : स्व. माधवराव उर्फ काका पाटील यांनी उमरगा-लोहारा तालुक्याच्या विकासासाठी स्वतःला जोखून देऊन मोठ्या मेहनतीने उभी केलेली साखर कारखानदारी, शिक्षणसंस्था या भागातील जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी जाणीवपूर्वक राबविलेल्या जलसिंचनाच्या लहान-मोठ्या पाणी योजना, बेनीतुरा मध्यम प्रकल्पाची उभारणी त्यातून झालेला कृषी, सहकार व औद्योगिक विकास. दरम्यान या परिसरात कुठलाही साखर कारखाना नसल्याने काकांनी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे हाल व खाजगी साखर कारखानदार यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी सहकारी तत्वावरील मुरूमच्या माळरानावर श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा झाला पाहिजे.

म्हणून साखर उद्योग उभारण्याचे ठरवून विकासाची पहिली मुहूर्तमेढ सन १९९४ साली विठ्ठलसाईच्या रूपाने रोवली गेली. साखर कारखान्याच्या अगोदर काकांनी सन १९७० मध्ये नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम या शिक्षण संस्थेचा पाया रचला. पुढे त्यांचे जेष्ठ चिरंजीव माजी राज्यमंत्री बसवराज पाटील व त्यांचे बंधू जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांनी त्यावर कळस चढविला. तसेच युवा नेते जनता सहकारी बॅंकेचे चेअरमन शरण पाटील हे वडीलांचा व काकांचा आदर्श घेऊन पुढे त्यांच्या विचारसरणीनुसार कार्यतत्पर राहून वाटचाल करीत आहेत. प्रारंभी स्व. माधवराव पाटील यांच्या समाधीस्थळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातील स्व. माधवराव पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास बुधवारी (ता.२०) रोजी बापूराव पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कै. माधवराव पाटील यांच्या २४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी व श्री माधवराव पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बापूराव पाटील, व्हाईस चेअरमन ॲड. व्ही. एस. आळंगे, विठ्ठल साई कारखान्याचे संचालक दिलीप भालेराव, माणिक राठोड, श्रमजीवी शिक्षण संस्थेचे संचालक मल्लिनाथ दंडगे, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, ड. संजय बिराजदार, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, मदन पाटील, रशीद शेख, धनराज पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, डॉ. राम सोलंकर, उल्हास घुरघरे, सलीम जमादार आदींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. रक्तदान शिबिरामध्ये उपप्राचार्य योगेश पाटील, सुदीप ढंगे, प्रा. हर्षद बदोले, प्रा. प्रियंका काजळे, वैष्णवी पाटील, मल्लू स्वामी, श्रीकृष्ण रक्त संकलन केंद्र, गुंजोटीचे सर्व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.




शहरातील कै. माधवराव पाटील सार्वजनिक वाचनालय, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी व नूतन विद्यालय, मुरुम तसेच विठलसाई सहकारी साखर कारखाना आदी ठिकाणी कै. माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

# ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविले पाहिजे

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन; जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीची बैठक संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक तसेच सर्व बँकांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत कर्जवितरणाची प्रगती, खातेउघडणीचे कामकाज आणि समितीने बँकांसमोर ठेवलेल्या उद्दिष्टांची अंमलबजावणी यांचा सखोल आढावा घेण्यात आला. तसेच ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सर्व बँकांनी नेमून दिलेले टारगेट शंभर टक्के पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे निर्देश देण्यात आले. उद्दिष्टपूर्ती वेळेत साध्य करण्यासाठी प्रभावी नियोजन करण्यावर भर देण्यात आला. तसेच प्रत्येक बँकेने ७५ टक्के खाते उघडणीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, अशी सूचना करण्यात आली.

काही बँकांच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त करून ठरवून दिलेले पीक कर्ज पूर्ण न करणे किंवा शासकीय योजना राबविण्यात झालेल्या दिरंगाईबाबत क्सिस बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, बंधन बँक आणि करूर वैश्य बँक यांना जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी नोटीस काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

बैठकीत नाबार्ड, ओबीसी महामंडळ, कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्र (DIC) यांचा आढावा घेण्यात आला. योजनांची प्रगती, निधी उपलब्धतेची स्थिती तसेच अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. कर्ज मंजुरी किंवा नकार प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यावर भर देण्यात आला. ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले. तसेच सर्व बँकांनी जबाबदारीने कामकाज करून उद्दिष्टपूर्ती साध्य करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. प्रगतीचा पुढील आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे संकेतही देण्यात आले.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखार्डे, बँक अधिकारी श्री. कदम, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र उमेशचंद्र दंडगव्हाळ, ओबीसी वित्त-विकास महामंडळ च्या जिल्हा व्यवस्थापक वृषाली लहारे यांच्या सह सर्व राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## वरिष्ठ आयपीएस अधिकारी सुनील दोरगे यांचे गोगावच्या सरपंच सौ. वनिता सुरवसे यांच्याकडून विशेष कौतुक व सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : गोगावच्या सरपंच तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्हा समन्वयक सौ वनिता सुरवसे यांनी महाराष्ट्र राज्य अँटी करप्शन ब्युरो नाशिक येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले वरिष्ठ आयपीएस अधिकारी श्री सुनील दोरगे साहेब यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्या उल्लेखनीय कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले.

या प्रसंगी सरपंच सौ. वनिता सुरवसे यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला. पोलीस सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यदक्षतेने काम करत सुनील दोरगे यांनी भ्रष्टाचारविरोधी मोहिमेत दिलेले योगदान अत्यंत उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

सुनील दोरगे यांनी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जबाबदारीची पदे सांभाळताना गुन्हेगारी नियंत्रण, आंतरराज्यीय गुन्हेगारांविरुद्ध कारवाया, अंमली पदार्थविरोधी मोहिमा तसेच भ्रष्टाचारविरोधी तपासामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी त्यांना राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या कार्यामुळे सामान्य नागरिकांचा कायदा व सुव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला असून तरुण पिढीला प्रामाणिक, निःस्वार्थ आणि ध्येयवादी सेवेसाठी प्रेरणा मिळत असल्याचे सौ. वनिता सुरवसे यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी सुनील दोरगे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील यशस्वी आणि उज्ज्वल कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## घाटकोपर पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेर अनधिकृत फेरीवाले स्टॉल पुन्हा सक्रिय; मनपा एन विभाग प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : घाटकोपर पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेरील अनधिकृत फेरीवाले स्टॉलवर काही दिवसांपूर्वी मनपा 'एन' विभागाकडून धडक कारवाई करण्यात आली होती. संबंधित कारवाई एन विभाग वॉर्ड ऑफिसर उपस्थितीत करण्यात आली होती. मात्र कारवाईनंतर पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत स्टॉल उभे राहिल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कारवाईनंतर काहीदिवसातच पुन्हा फेरीवाले स्टॉलवाले पूर्वीप्रमाणे त्याचठिकाणी व्यवसाय करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मनपा एन विभाग प्रशासनाच्या कारवाईची परिणामकारकता तसेच अनधिकृत व्यवसायांना नेमका कुणाचा पाठिंबा आहे का ? याबाबत चर्चा सुरू झाली आहे.या प्रकरणात संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन पुन्हा कारवाई करावी तसेच अनधिकृत फेरीवाले स्टॉल पुन्हा त्याच ठिकाणी कसे उभे राहिले, याची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. आता मनपा एन विभाग प्रशासन यावर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अधिक महिन्यानिमित्त निमित्त पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी अधिक महिन्यानिमित्त पंढरपूर मध्ये एक लाखापेक्षा अधिक भाविक पंढरपूर मध्ये दररोज दाखल होत आहेत. वाहतुकीची कोंडी येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये. पाच ज्यादा अधिकारी व शंभरहून पोलीस अधिकारी जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी नियमावली अशी मागणी होत आहे.

उन्हाळी सुट्टी व अधिक महिन्याच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांची संख्या दररोज वाढत चाललेली आहे. पंढरपूर मध्ये दररोज विठ्ठलाच्या दर्शनासाठी एक ते दीड लाख भाविक दाखल होत आहेत. गरजेचा फायदा घेऊन चोरटे महिलांचे दागिने चोरण्याचा प्रकार घडत आहेत.

सध्या पंढरपूर मध्ये अधिकाऱ्यांची व पोलिसांची संख्या कमी आहे काही अधिकारी रजेवर गेले तर काही अधिकार्यांची बदली झाली आहे. त्या अधिकाऱ्यावर पोलिसांचा बंदोबस्ताचा ताण होत आहे. तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सुरक्षेसाठी खास बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मात्र यामधील काही जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी लक्ष घालून पाच अधिकारी व पन्नास शंभर पोलीस अधिक महिन्यानिमित्त बंदोबस्तासाठी देण्यात येईल अशी मागणी होत आहे.

## अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सारणीमध्ये अतिशय उत्साहामध्ये सुरुवात






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : मौजे सारणी तालुका औसा येथे दिनांक २१/ ५/ २०२६ रोजी सप्त्याची सुरुवात होत असून दररोज प्रवचन कीर्तन हरिपाठ गाथा भजन व संध्याकाळी बारानंतर हरी जागर असे सप्त्याची दैनंदिन रूपरेषा आहे

सप्त्याची व्यासपीठ अधिकारी म्हणून ह भ प चंद्रकांत बसलीग पाटील व अनिल बाबुराव कदम हे आहेत

दररोज नावाजलेले कीर्तनकार आहेत त्यामध्ये ह भ प बुद्धिवंत बिराजदार महाराज रामलिंग मुदगड ह भ प गहिनीनाथ महाराज समदर्गा यांचे अध्यात्मिक व विनोदी कीर्तन प्रवचनामध्ये ह भ प गायकवाड गुरुजी सास्तुर मुख्याध्यापक शांतेश्वर विद्यालय सास्तुर ह भ प वनिता कुलकर्णी यांचे प्रवचन सेवा ह भ प हरी ओम कोथळे महाराज सारणी हे बाल कीर्तनकार आहेत व ह भ प चंद्रभान महाराज मसलेकर यांचे काल्याचे किर्तन व औसा येथील बाल वारकरी सप्त्यामध्ये सामील आहेत व तबलावादक म्हणून गोरख वाघमारे दीपक बिराजदार कमलाकर पाठवतकर विठ्ठल भोई परमेश्वर पाटील हे हार्मोनियम व गायक आहेत

ज्ञानेश्वर महाराज संत तुकाराम महाराज यांनी अध्यात्मक व विज्ञानाची जोड घालून जी शिकवण दिली जाते

यामध्ये दररोजअन्नदान ची व्यवस्था सारणी गावातील ग्रामस्थांनी केली आहे व सप्त्याची महाप्रसाद खंडू गणपत मुळे यांच्याकडून महाप्रसादाची व्यवस्था केली आहे

या सप्त्याची सर्व संचालन बसवेश्वर तरुण मंडळ यांनी अतिशय उत्तम प्रकारे केले आहे व सप्त्याची सांगता दिनांक २८ ५ २०२६ रोजी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सांगता होणार आहे व सर्व भाविकांनी मौजे सारणी येथील सप्त्याचा लाभ घ्यावा.

**दुचाकीस्वार धोक्यात; अपघातांना मिळतेय आमंत्रण**

# रस्त्यांच्या कडेला साचणारी माती आणि धूळ ठरतेय दुचाकीस्वारांच्या अपघातांना निमंत्रण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : एलबीएस मार्ग तसेच विक्रोळी ईस्ट वेस्ट ब्रीज येथील रस्त्याच्या कडेला साचलेली माती ,धूळ व खडी यामुळे दुचाकी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः यामुळे वळणाच्या ठिकाणी वाहनांचे नियंत्रण बिघडून अनेक दुचाकी या वाळू वरून घसरून अपघात होत असल्याच्या घटना घडत आहेत. तसेच मुंबईतील अनेक मोठ्या उड्डाणपुलांच्या रस्त्याच्या कडेला साठलेली माती, वाळू यावरून दुचाकींचे नियंत्रण सुटून स्लीप होण्याच्या घटना घडत आहेत. यामुळे अनेक दुचाकी चालकांना गंभीर दुखापती झाल्याच्या घटना घडल्या आहेत.महानगरपालिकेच्या वतीने नियमितपणे रस्ते साफ केले जात नसल्यामुळे या घटना घडत आहेत असा आरोप दुचाकी चालकांकडून करण्यात येत आहे. तरी महापालिका विभागाने तातडीने याठिकाणी साफसफाई करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना कराव्यात,अशी मागणी दुचाकी वाहनचालकांकडून करण्यात येत आहेत.

**रस्त्याच्या कडेला साचलेली माती, धूळ आणि खडी यामुळे दुचाकी चालवताना मोठा धोका निर्माण होत आहे. विशेषतः वळणाच्या ठिकाणी वाहन घसरण्याच्या घटना वाढत असून, महापालिकेने नियमित साफसफाई करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.**

**– हरीश मोहिते, दुचाकी चालक**



## निफाडला स्व.राजीव गांधी यांना अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या ३५ व्या पुण्यतिथीनिमित्त निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस निफाड चे माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर यांनी पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन केले.

यानंतर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी स्व. राजीव गांधी यांच्या जीवन कार्याविषयी उपस्थितांना विस्तृत माहिती मनोगतातून दिली.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, वाचनालयाचे सहचिटणीस राहुल दवते, संचालक राजेंद्र खालकर, सुनील चिखले, सुहास सुरळीकर, श्याम गोळे, सभासद अशोक पगारे, ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहायक ग्रंथपाल सौ. आरती जंगम, नंदकुमार पुंड, सौ.अनिता इस्ते आदी उपस्थित होते.